Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III | ISSUE-VII | July | 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# शैक्षणिक व्यवस्थापनात ICT चा वापर

प्रा.सोनुने एस.एस.
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मूक्त विद्यापीठ नाशिक

**प्रस्ताविक**

शिक्षणाच्या संख्यात्मक विस्ताराबरोबरच ज्ञानांचा विकास व प्रसार करणारी साधने व माध्यमे देखील वाढलेली आहे. त्या सर्व साधन व माध्यमात संगणकचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. आज औद्योगिक क्षेत्राबरोबरच इतर क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात ICT चा वापर व्यवस्थापनात केला जात आहे. शैक्षणिक क्षेत्र त्यास अपवाद नाही,हे नव्याने सांगण्याची गरज वाटत नाही.शिक्षणाशी संबधीत बहूतांशी सर्वच संकल्पना,अनेक प्रकारचे ऑनलाइन शिक्षणक्रम,तसेच संपूर्ण जगातील ज्ञानाचे भांडार संगणकाच्या एका क्लिकच्या उपलब्ध झाले आहे.विशिष्ट माहिती बरोबरच,इतर अनेक प्रकारच्या महितीचे संकेतीकरण व विश्लेषण संगणकाच्या माध्यमातून अल्प कालावधीतच होते. विविध प्रकारची दुर्मिळ माहिती छोट्याशा जागी जतन करता येऊ लागल्याने माहिती साठविण्यासाठी ची कागदपत्रे सांभाळणे व त्यांचे उन,वारा,पाऊस,आग यांच्या पासून संरक्षण करणे व जतन करणे ह्या त्रासा पासून मोठ्या प्रमाणात मुक्ती मिळाली आहे.तज्ञ व्यक्तीच्या ज्ञानाचा फायदा विशिष्ट अध्ययनार्थीनाच न होता ऑनलाइन पद्धतीने,किंवा त्यांचे व्याख्यान रेकार्ड करून,यु-ट्युब किंवा विशिष्ट शैक्षणिक संकेतस्थळावर टाकल्याने त्यांचा फायदा अनेक अध्ययनार्थीना होतो. आज शैक्षणिक अशी अनेक व्याख्याने व कार्यक्रम विविध शैक्षणिक संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.शालेय व्यवस्थापनाला आर्थिक बाबींशी संबंधित जमा खर्चाच्या नोंदी करण्यासाठी व्यवहाराच्या प्रकारानुसार साफ्टवेअर तयार करून त्याच्या साह्याने संगणीकृत आर्थिक जमा –खर्चाच्या नोंदी अचूक होतात.विद्यार्थी संदर्भातील कल्याण योजना,विविध शासकीय योजना व गुणवत्ता विकासासाठीच्या विविध बाबींची माहिती आनलाईन उपलब्ध होत असल्याने शालेय व्यवस्थापकाला संगणक कौशल्यापूर्वक हाताळण्याचे कौशल्ये आत्मसात करून,त्याचा प्रत्यक्ष व्यवस्थापनात वापर करणे गरजेचे आहे.मुख्याध्यापक शाळेचा प्रमुख व मार्गदर्शक असल्याने त्याला इतरांना मार्गदर्शन करावे लागतेशिवाय आज मितीला येणारे सर्व संदेश हे मेल अथवा अधिकृत विशिष्ट शासनाने वा प्रशासनाने निर्देशित केलेल्या संकेत स्थळावर येत असतात.ते पाहून,त्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी मुख्याध्यापकाला संगणक हाताळण्याचे ज्ञान असणे गरजेचे आहे.शिवाय संगणकाचा वापर व्यवस्थापणात केल्याने मनुष्यबळ, वेळ श्रम यांची बचत, होऊन कामाचा दर्जा देखील सुधारतो व

कामाची गती वाढते. भारत सरकारने 1980 मध्ये class computer literacy and awareness in secondary schools )प्रकल्प हाती घेऊन ICT शिक्षणाबाबत जागृती करण्याचे महत्वाचे कार्य केले. सुरुवातीच्या काळात ICT वापरा वापरा संदर्भातील practice basic कौशल्या संदर्भातील असली, तरी ती महत्वाची अशी होती. शासनाने माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामान्य जनतेस शासनाच्या सर्व सेवा माफक दरात पारदर्शक व जलद गतीने मिळविण्यासाठी,ई-प्रशासन प्रकल्प धोरण डा.विजय भटकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या तज्ञ समितीच्या शिफारशी तयार केले व दिनांक 23 सप्टेंबर 2011 ई-प्रशासन धोरण जाहीर केले.त्याच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की,**महाराष्ट्र शासन भारतात ई प्रशासन व माहिती आणि संगणक तंत्रज्ञानाचा पाया रचणाऱ्या पैकी एक आहे. तसेच नागरिकांच्या गरजा आणि उच्च प्रतीची सेवा पुरविणाऱ्या ई प्रशासन बाबतचे कार्यक्रम राबविण्यात आघाडीवर आहे**. ह्या ई- प्रशासन धोरणाची ध्येय व उदीष्टे स्पष्टपणे नमूद केली आहे, की शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षम आणि कागदविरहित करणे, तसेच नागरिकांना विविध सेवा ऑनलाइन पद्धतीने पुरविणे, व ई-प्रशासनाकडून (मोबाइल) प्रशासनाकडे वाटचाल करणे ही आहेत. हे धोरण महाराष्ट्र राज्यातील केंद्र व राज्य शासनाच्या कायद्यानुसार स्थापना केलेल्या संस्था आणि अशा संस्था ज्यांच्या रचनेत आणि प्रशासनात सरकारचे नियंत्रण मुख्य असेल. किंवा केंद्र अथवा राज्य शासनाच्या मालकीच्या असतील किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असतील व शासनाकडून इतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ मिळालेल्या संस्था तथा सार्वजनिक हिताचे कार्य करणाऱ्या संस्था ह्या सर्वांना लागू राहील.

सदरील धोरणाचा विचार करता,शालेय प्रशासन व व्यवस्थापन देखील ई-प्रशासनाच्या दृष्टीने चालविता येण्यासाठी शासनाने पावले उचलली असून त्या अनुसंगाने विद्यार्थी डाटाबेस, विद्यार्थी पोर्टल ऑनलाइन पद्धतीने सुरू केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या school Education and sports Department ने देखील महाराष्ट्रातील सर्वच 1 ते 12 पर्यन्त अध्ययन करणा-या अध्ययनार्थींची माहिती संग्रहीत करण्यासाठी **विद्यार्थी डाटाबेस पोर्टल** (सरल)विकसित केले आहे.विद्यार्थी डाटाबेस पोर्टल द्वारे विद्यार्थींची वैयक्तिक माहिती संग्रहीत केली जात आहे. की ज्यामुळे अध्यायनार्थीला एक विशिष्ट सांकेतांक देऊन, ती माहिती विद्यार्थीच्या संपूर्ण शैक्षणीक कार्यकालात वापरता येईल,की ज्यामुळे पुढिल टप्प्यात अध्यनार्थीला दिल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृती, त्यांची कौटुंबिक माहिती आणि आरोग्य घटक यासारख्या इतर बाबींना संरक्षण दिले जाऊ शकते. त्यात मुख्याध्यापक, वर्गशिक्षक दोघांना देखील विद्यार्थी संदर्भात माहिती अपडेट भरावी लागते करता येते.अध्यापकला फक्त त्याच्या कामाच्या संदर्भातील माहितीच फक्त भरता येते.मूख्याध्यापकाला विद्यार्थी व संपुर्ण शालेच्या संदर्भात माहिती अपडेट करता येते.ती माहिती पोर्टलवर आन लाईन अचूक भरण्याची जबाबदारी शाळेचा प्रमूख म्हणून मुख्याध्यापकाचीच आहे.त्यामुळे मुख्याध्यापकाला ICT चा वापर येणे गरजेचे आहे.शिवाय ICTखालील बाबीसाठी प्रभावीपणे मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. सर्व माहिती एका बटणात उपलब्ध होते. ICT च्या वापरामुळे शिक्षणाची ध्येय ही बदलत आहे. त्यामुळे मुख्यध्यापकाला विविध प्रकारच्या परिस्थितीत निर्णय घेण्यासाठी व विविध प्रकारची माहिती मिळविण्यासाठी व पाठविण्यासाठी ICT च्या वापराचे ज्ञान

असणे आवश्यक आहे. ICT मध्ये अनेक बाबींचा समावेश होत असला तरी,सदरील संकल्पनात्म पेपर मध्ये फक्त संगणक व इंटरनेट चा शैक्षणिक व्यवस्थापनात वापराच्या अंगाने विचार केलेला आहे.

१) **बायोमॅट्रीक पध्दतीने कर्मचारी व विद्यार्थी उपस्थिती नोंद** – महाराष्ट्र शासनाच्या ई- प्रशासन धोरणाने सर्व कार्यालयामध्ये बायोमेट्रिक हजेरीची पद्धत अनिवार्य करण्याबाबत मार्गदर्शन केले आहे.त्यानुसार इतर कार्यालयाबरोबरच शाळेत देखाल बायोमॅट्रीक यंत्र लावण्यात आले आहे. त्याच्या माध्यमातून कर्मचारी उपस्थिती ची नोंद घेतली जात आहे.त्याच प्रमाणे विद्यार्थीची सुध्दा बायोमॅट्रीक पध्दतीने उपस्थिती नोंद घेता येऊ शकेल व विद्यार्थी उपस्थिती नोदविण्यासाठी लागणारा वेळ वाचेल व तो अध्यापन कार्यासाठी वापरता येईल.बायोमॅट्रीक यंत्र संगणकाला जोडले जात असल्याने ते जतन आपोआप जतन केले जाते.

2)**आन लाईन पध्दतीने अध्ययनार्थीचे मूल्यमापन-** शालेय विषयासंदर्भातील वस्तूनिष्ठ प्रश्न द्वारे ज्ञानात्मक पातळीवरील मूल्यमापन आन लाईन परिक्षेच्या माध्यमातून करता येते.आज विविध स्पर्धा परिक्षांचे आयोजन ह्या पध्दतीने केले जात आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मूक्त विद्यापीठ चे विविध शिक्षणक्रमाचे पेपरचे मूल्यमापन आन स्क्रिन आनलाईन पध्दतीने मूल्यमापन केले जात आहे.तसेच निकाल देखील आनलाईन पद्दतीने जाहीर केले जातात.च्याच प्रमाणे शालेय स्तरावर शिष्यवृती परिक्षेचे निकाल देखील आनलाईन पध्दतीने जाहीर केले जात आहे.

3)**संगणकाव्दारे अध्ययनार्थीशी संबंधिक विविध प्रकारच्या माहितीचे संकलन व व्यवस्थापन (विद्याथी डाटाबेस)** - अध्ययनार्थीशी संबंधित विविध प्रकारच्या माहितीचे उदा.त्याची शैक्षणिक प्रगती,त्याची आर्थिक परिस्थिती,त्याची सामाजिक वर्गवारी,त्याचे राहण्याचे क्षेत्र,पालक इ.बाबीसंदर्भातील माहिती संगणकाद्वारे जतन करता येते.

4)**संगणीकृत ग्रंथालय** - आज इंटरनेटवर माहितीचा खजाना आहे. आपणाला हवी असलेली माहिती आपणाला इंटरनेटच्या माध्यमातून मिळवता येते.शालेय अध्ययनार्थीसाठी आवश्यक असलेली माहिती मिळण्यासाठी विविध प्रकारच्या शैक्षणिक वेबसाईड वरून माहितीचे संकलन करून ग्रंथालय संगणीकरण करता येते.आज इटरनेटच्या माध्यमातून आनलाईन ग्रंथालय उपलब्ध आहेत.तसेच अनेक प्रकारचे आनलाईन जर्नल ,पुस्तके उपलब्ध आहेत.त्याचा वापर अध्ययनार्थीचे वाचन समृध्द करण्यासाठी करता येईल.

5)**CCTV कॅमे-याच्या चा प्रभावी शालेय व्यवस्थापनासाठी वापर-** आज जवळपास ब-याच कार्यालयात तसेच दुकानात तसेच सार्वजनिक वा गर्दीच्या स्थळी देखील CCTV कॅमेरे लावलेले आढळतात.त्यामुळे बाहेर काय घडामोडी घडत आहे. त्याची माहिती एका जागे वरून दिसते.व काही कालावधी प्रर्यन्त तीचे जतन देखील केले जाते.तसेच वर्गव्यवस्थापनात देखील त्याचा वापर होऊ शकतो.

6)**आडीओ व्हिडीओ व्याख्यानाचे सग्रंहीकरण व सादरीकरण-** ICT चा वापर करून विविद तज्ज्ञांचे व्याख्यान आडीओ व्हिडीओ पध्दतीने रेकार्ड करून विद्यार्थ्यांना हव्या त्या वेळी दाखविता येतो किंवा ऐकविता येते.त्यांच्या तज्ज्ञतेचा फायदा ICT चा वापर करून अनेक विद्यार्थ्यांपर्यंन्त पोहचविता येतो.

7)**वेबसाईट वरून शालेय उपक्रम व कार्याची माहिती** – आज बहुसंख्या शैक्षणिक संस्थांच्या वेवसाईड आहेत.त्याच्या माध्यमातून शैक्षणिक उपक्रम,अभ्यासक्रम व कार्यक्रमांच्या माहितीचा प्रचार व प्रसिध्दी करता येते.

8)**मॅसेज व मेल द्वारा पालकांशी संपर्क-शाळेच्या संदर्भात चालणा-या विविध कृतिंची माहिती-** पालक आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीच्या बाबतीत जागरूक होत आहेत.त्यांमुळे त्यांच्या पाल्यांच्या प्रगतीची माहिती मॅसेज व मेल च्या माध्यमातून पालकांना देता येते.त्यामुळे आपला पाल्य शाळेत काय करितो ह्याची त्यांना जाणीव होते.

९)**विद्यार्थी विकास**- ICT वापरामुळे अध्ययनार्थी हे गुंतून रहतात.Technical, practical and critical Technical म्हणजे Technology च्या वापरच्या हेतूने गुंतलेले वाटतात. त्यांच्या बरोबर अनेक प्रात्यक्षिक कृती ते करत असतात,त्यासाठी सक्षम होत असतात. उदा. संगणकाचा वापर करीत असल्याने,ते एखाद्या गोष्टीची अधिक माहिती मिळविण्यासाठी online data चा वापर करतात,संशोधन publishing and prediction चे दैनदिन कामे करतात. त्या संदर्भात चिकित्सकपणे विचार करतात. व ICT वापरासंदर्भात एक घटना विकसित करतात. तसेच त्यातून स्वत:चे मूल्यमापन देखील करतात. आज ICT चा वापर कलाशाखेतील विषयापासून विज्ञानातील विषयापर्यंत केला जात आहे.ICT चा वापर करून विकेंद्रीत असलेल्या अध्यायनर्त्यसाठी उद्देशातील सुविधा दिली जाते. त्यांचे group वापर करून त्यांचे अध्ययन-अध्यापन हे आधिक चांगले होऊ शकते.म्हणजेच अध्ययनार्थीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी ICT ची भूमीका महत्वाची ठरते.

१०)**विद्यार्थी प्रवेशासाठी ICT चा वापर**- अध्ययनार्थीच्या प्रवेशासाठी साफ्टवेअर तयार करून आनलाईन प्रवेश केले जातात.प्रवेशासाठी पात्र असलेल्या अध्ययनार्थीचे गुणवत्ता यादी नुसार प्रवेश निश्चित करता येते.ज्या शाळात प्रवेशासाठी जास्त प्रवेशाच्छुक असतात.तेथे या पध्दतीने प्रवेश केले जाऊ शकतात.

११)**अध्यापनात ICT चा वापर**- पावर पाईन्ट ,अनिमेशन द्वारे अध्यापन,भाषा प्रयोगशाळा तसेच संगणीकृत अध्ययन-अध्यापनाचे कार्यक्रम निर्माण करून वापर करता येतो.
१२) शासनाच्या विविध शिष्यवृत्ती संदर्भीतील अर्ज आनलाईन पध्दतीने भरले जात आहेत्यामुळे विद्यार्थ्यांचे त्या संदर्भातील कागदपत्रांचे रेकार्ड सांभाळण्याची गरज भासत नाही.

**याशिवाय ICT चा शाळेच्या व्यवस्थापणात वापर विविध दृष्टीकोनातून करता येईल.**

१)शाळेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी काम व्यवस्थित करण्यासाठी करता येईल.

२)शाळेतील विविध क्रियांचे व्यवस्थापन अचुकता आणि सहजता आणण्यासाठी

३) IT-education, ICT in Education and, ICT in Administration संदर्भात शाळेतील घटक एकसंघ एकात्म बनविणे.

४)अध्यापकांच्या अध्यापनात रंजकता,परिणामकारकता आणण्यासाठी.

५)शाळेच्या संदर्भातील विविध दस्तऐवज जतन करण्यासाठी.

६)शाळेच्या संदर्भातील विविध आठवणीतील प्रंसगांचे चित्रित अथवा मुद्रीत जतन करण्यासाठी.

शाळेचा मुख्याध्यापक हे शाळेत ICT च्या एकसंघ वापरासाठीचा महत्वाचा दुवा आहे.(शाळेच्या कार्यपद्धती ICT चा वापर करण्यासाठी ) त्यासाठी त्यांना त्यांची एकात्मका समजने आणि त्यासाठीची आवश्यक कौशल्य येणे गरजेचे आहे.

**शालेय व्यवस्थापनात संगणकाचा वापर करण्यासाठी मुख्याध्यापकाची भुमीका -**

१)शाळेच्या मुख्याध्यापकावर शाळेमध्ये ICT च्या वापराबाबत मार्गदर्शन करण्याची महत्वाची जबाबदारी आहे.

२)ICT वापरा संबधीत शाळेला एक मॅप तयार करणे.

३)ICT च्या वापरासंबधीत योग्य व्यक्तीची निवड करणे,इतरांना प्रशिक्षण देणे निवारण करणे,त्यांचा वेगवेगळ्या जबाबदऱ्या सोडविणे.

४)आपले स्वत:चे ICT सांधर्बत ज्ञान अदयावत ठेऊन,विविध अडचणी हाताळण्याच्या बाबत मार्गदर्शन करणे.

५)अध्यापन व विद्यार्थी सेवा,तसेच कार्यालयीन व्यवस्थापन व आर्थिक व्यवस्थापन यासाठी योग्य साफ्टवेअर तयार करून घेणे व त्याचा वापर करून घेणे.

६)शाळेच्या बजेट मध्ये ICT खर्चाबाबतची तरतूद करणे.

७)शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांरी ,अध्यापक, आणि अध्ययनार्थी यांना ICT चा वापर करायला लावणे त्यासाठी त्यांना आवश्यक असल्यास प्रशिक्षण देणे व वापराबाबत प्रेरणा देणे.

८)ICT वापरा सांधर्बत तंत्रज्ञांनाच्या शिफारशी लक्षात घेऊन, त्यांची पुर्तीता आपल्या शाळेला संदर्भात करणे.

९)ICT च्या संदर्भात आधुनिक बदलाच्या प्रवाहाबरोबर राहून,शाळेला ICT च्या वापर जास्तीत जास्त फायदा होईल यांचा विचार करणे.

10)शाळेत कर्मचारी व विद्यार्थी यांच्यासाठी इंटरनेट ची सुविधा लॅन मार्फत करून देणे.

11)अध्ययनार्थींना आवश्यक त्या माहितीची प्रिंन्ट घेणे साठी प्रिंन्टरची व्यवस्था करणे.

**मुख्याध्यापकाने ICT चा व्यवस्थापनात वापर करण्यासाठी खालील बाबी लक्षात घ्याव्या.**

ICTचा शाळेत वापर करणे म्हणजे ही गोष्ट कपातील चहा संपविण्या इतपत सोपे नाही आहे.त्यासाठी मुख्यध्यापकांना लक्षात घ्याव्या लागतील.

१)ICT संदर्भातील मूलभूत ज्ञान असणे गरजेचे आहे.

2)शालेय व्यवस्थापनात ICT च्या वापराबाबत सक्रिय सहभाग घेऊनच ICT वापराचा परिणाम मोजावा आणि समजावून घ्यावा लागेल.

3)तंत्रज्ञांनातील नेतृत्व करण्यासाठी मुख्यध्यापकाला किमान खालील बाबी करता येणे व समजणे गरजेचे व आवश्यक आहे.

A)Word processor आणि प्रेझेंटेशन सॉफ्टवेरचा वापर.

B)e-mail आणि नेटसर्फिंग

C)शाळेत वापरल्या जाणाऱ्या बेसिक टेक्नालोजी

D)तंत्रज्ञान हे काय वेगळे करतेय किंवा त्याचे परिणाम काय होतात.

E)विविध आय.डी.आणि पास वर्ड यांची गोपनीयनीयता.

F)अन्टीव्हायरस साफ्टवेअर बाबत अद्यावत माहिती.

४)शाळेची विद्यार्थी संख्या व कर्मचारी संख्या यानुसार संगणक संख्या.

५)शासनाने बंदी आणलेल्या वेबसाईड कुणीही पाहणार नाही.

६)शैक्षणिक माहिती असणा-या वेबसाईड वापरण्यासाठी प्रोत्साहन.

७)प्रत्येक अध्यापककडून अध्यापनात ICT वापर होण्यासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शन.

८)प्रत्येक कार्यालयीन कर्मचारी वर्गाकडून कार्यालयीन कामासाठी ICT वापर होण्यासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शन.

९)शाळेची संगणक लॅबचे आवश्यकतनुसार अद्यावतीकरण.

**ICT च्या शालेय व्यवस्थापनात वापर करण्यासाठी खालील प्रकारची व्यवस्था शाळेत असणे आवश्यक आहे.**

१)संगणक

२)Digital cameras and Digital video cameras

३)Telephones, fax machines, mobile Telephones.

४)Video conferencing technologies and closed circuit television.

५)Data projectors and electronic white boards.

६)Power supply (smps)

७)Pen drive/ hard disk and other software

८)Internal services / ISP- Internet service Provider.

९)Wll - Wireless in local loop

१०)Wi-Fi – Wireless fidelity

**समारोप-** आजच्या स्पर्धात्मक युगात ICT चे ज्ञान नसलेला व्यक्तीला सर्वांबरोबर प्रगती करतांना अनेक अडचणी येतात. ICTच्या वापरामुळे कामाची गती वाढते,श्रम,पैसा,वेळ यांची बचत होते.शिवाय आपणाला हवे त्या प्रमाणे काम करून घेता येते.आज अनेक शिक्षणक्रम आनलाईन पध्दतीने शिकवले जात आहे. ICT च्या वापरामुळे जग हे अत्यंत जवळ आलेले आहे.ज्ञानाच्या कक्षा रूदांवलेल्या आहेत.आज सर्वच श्रेत्रात कामाची गती व दर्जा उंचावण्यासाठी,तसेच वेळ ,श्रम,पैसा यांची बचत होण्यासाठी ICT चा वापर केला जात आहे. शैक्षणिक व्यवस्थापनात त्याचा वापर केल्यास त्यांचा वापर निश्चितच सकारात्मक होईल.आज अनेक खाजगी शाळामध्ये त्या दृष्टीकोनातून ICT चा वापर केला जात आहे.शासकीय शाळामध्ये ही याबाबत कार्य होतांना दिसून येत आहे.आज जवळपास ब-याच मुख्याध्यापकांना शाळेच्या कामकाजासंदर्भात शासकिय संकेत स्थळावरील माहितीचे अवलोकन करावे लागत आहे,शिवाय आनलाईन पध्दतीने माहिती शासनाला पाठवावी लागता आहे.एकंदरीत पाहाता ICT च्या शैक्षणिक व्यवस्थापनातील वापरामुळे शालेय व्यवस्थापन गतीमान व पारदर्शक होऊन कामाचा दर्जा उंचावतो.कार्यालय व्यवस्थापन,विद्यार्थीसेवा कल्याण व गुणवत्ता विकास,तसेच आर्थिक व्यवस्थापन,मानवीसंबंधाचे व्यवस्थापन या अनुषंगाने ICT चा शैक्षणिक /शालेय व्यवस्थापनात वापर करता येतो.

**संदर्भ सूची.**

1) Laxman Mohanty.(2006)ICT Strategies for Schools –A Guide for School Administratiors,sage publication India pvt Ltd New Delhi
2) महाराष्ट्र शासन : माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग. शासन निर्णय क्रमांकः मातंसं/नस्ती . (2010/प्र.क्र.34/39 तारीख: 3 मे, 2014),STATE e-GOVERNANCE PRIORITIES FOR 2014-2015 (201405021539431111 e-govrnrces).
3) Howard Pitler(2007),Using technology with classroom instruction that works, Mid-continent Research for Education and Learning,4601 DTC Boulevard, Suite 500,Denver, Colorado 80237 USA.
4) S.Rajasekar,E-Resources for teaching and learning, Annamalai university.